<u>नियमित दिवाणी दावा क्र.३४/२०१४</u>

<u>निशाणी क्रमांक – १४ ची पुरवणी</u>

<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.२ नामे मधुकर अजिनाथ निंबाळकरचा उलटतपास नाहीचा दि.२८/०७/२०२५ राजीचा आदेश नि.क्र.८६ वरील दि.२०/११/२०२५ रोजीच्या आदेशान्वये रद्द करण्यात आलेला आहे. त्यानंतर सदर साक्षीदाराचा उलटतपास.</u>

<u>प्रतिवादी क्र.१ च्या वतीने विधिज्ञ श्री. एस. जे. वाकडे यांच्यामार्फत सदर साक्षीदाराचा उलटतपास शपथेवर सुरु–</u>

१. हे म्हणणे खरे आहे की, वादी माझा सख्खा भाऊ आहे. आम्हाला दोन सख्या बहिणी असून शारदाबाई देविदास घाडगे व रत्नमाला चांगदेव जाधव अशी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मौजाबाई निंबाळकर माझी आई आहे. हे म्हणणे खरे आहे की, मौजे दिघी येथील गट क्र.६७/४, ६८/१, ६८/३, ३४/२ व ३४/३ या आमच्या वडीलोपार्जित मिळकती आहेत. हे म्हणणे खरे आहे की, वादीने प्रस्तुत दावा दाखल करण्यापुर्वी माझी आई मौजाबाई व बहिण शारदाबाई यांनी आमच्या वडीलोपार्जित मिळकतींबाबत मी व माझ्या भावा विरुध्द वाटपाचा नियमित दिवाणी दावा क्र.१९०/२०१३ दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या दाव्यामध्ये मी व वादीने प्रतिवादी क्र.१ च्या लाभातील खरेदी खताबाबत कोणतीही मागणी केलेली नव्हती. माझी आई व बहिण यांनी दावा दाखल केल्यानंतर त्या न्यायालयात गैरहजर असल्यामुळे सदरचा दावा खारीज करण्यात आला किंवा कसे हे मला माहित नाही.

२. आमच्या वडीलोपार्जित मिळकतींचे वाटप माझ्या वडीलांच्या हयातीतच झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझा भाऊ सुभाष याच्या हिश्यास वाटपाने दिलेल्या हिश्यास माझा तसेच माझी आई व बहिणी यांचा काहीही संबंध नाही. माझा भाऊ सुभाष हा शेती बरोबरच स्वस्त धान्य विक्रीचा परवाना धारक असल्याचे मला माहित नाही. मी मागील १० वर्षापासून रेशनींगचे धान्य घेत नाही. हे म्हणणे खरे आहे की, १० वर्षा अगोदर माझा भाऊ सुभाष हा स्वस्त धान्य विक्रीचे दुकान चालवत होता. त्यापुर्वी साधारण १० वर्षा

अगोदर पासून सुभाष स्वस्त धान्य विक्रीचे दुकान चालवित होता. वादीच्या पत्नीचे नाव जयश्री निंबाळकर आहे. तिचे माहेर मौजे म्हैसगाव, ता.माढा, जि. सोलापुर आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादीची पत्नी अंगणवाडी सेविका म्हणून मौजे दिघी येथे नोकरी करीत आहे. ती तिचे लग्न झाल्यापासून अंगणवाडी सेविका म्हणून नोकरी करते. हे म्हणणे खरे आहे की, माझा भाऊ सुभाष व त्याची पत्नी यांना स्वतःचे मुलबाळ नाही.

३. हे म्हणणे खरे नाही की, वादीची पत्नी जयश्री हिला कधीही मोठा आजार झालेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१० मध्ये सुभाष याला त्याच्या जमीनीची सुधारण व घर खर्चासाठी पैशाची गरज होती. दावा मिळकत म्हणजे गट क्र.३४/३ ही बागायती जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, बेबी गोरख इंगळे ही आमच्या गावातील रहिवासी आहे. हे म्हणणे खरे नाही की, बेबी गोरख इंगळे हिच्या पतीच्या नावावर असलेली मिळकत दावा मिळकतीच्या लगत आहे.

प्रश्न : हे बघा, प्रतिवादी क्र.१ बेबी इंगळे व तिचे कुटूंबीय दावा मिळकतीची वहिती करुन उपभोग घेत आहेत ?

उत्तर : दावा मिळकत सध्या पडीक आहे.

वादीने प्रतिवादी क्र.१ च्या लाभात दावा मिळकतीबाबत लिहून दिलेले खरेदी खत मी बघितलेले नाही. सदर खरेदी खताच्यावेळी मी तेथे प्रत्यक्ष हजर नव्हतो. वादी माझ्यापासून साधारण अर्धा कि.मी. अंतरावर राहतो. हे म्हणणे खरे नाही की, वादी व प्रतिवादी यांच्या दरम्यान दावा मिळकत विक्रीचा व्यवहार निश्चित झाला त्यावेळी मी तेथे हजर नव्हतो. साक्षीदार सांगतो की, केवळ सदर खरेदी खताच्यावेळी मी तेथे हजर नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदी खताच्यावेळी वादीने प्रतिवादी क्र१ ला दावा मिळकतीचा ताबा दिला तेव्हापासून दावा मिळकत प्रतिवादी क्र.१ च्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर खरेदी खताच्यावेळी प्रतिवादी क्र.१ हिने जमीनीचा मोबादला म्हणून माझ्या भावाला ४,१०,०००/- दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, वादीने दावा मिळकत र.रु.४,१०,०००/- या किमतीस कायम स्वरुपी प्रतिवादी क्र.१ हिस विक्री केलेली आहे.

४. हे म्हणणे खरे नाही की, माझा भाऊ म्हणजे वादीने दावा मिळकतीचे प्रतिवादी क्र.१ च्या लाभात परत सोडवण्याच्या बोलीवर खरेदी खत करून दिले होते हे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर खरेदी खतानंतर दोन वर्षे मुदतीनंतर प्रतिवादी क्र.१ ने दावा मिळकतीचे खरेदी खत वादीच्या लाभात उलटवून देण्याबाबत ठरले होते हे देखील मी खोटे कथन केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादीने सदर खरेदी खतानंतर प्रतिवादी क्र.१ ला आजपावेतो कोणतीही रक्कम दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीने सदर खरेदी खतानंतर प्रतिवादीस रक्कम देण्याचा कधीही प्रयत्न केलेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, मौजे दिघी हे गाव सिना नदीच्या काठी आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या गावात सध्या जमीनीचे प्रचलीत भाव प्रती एकरी २०-२५ लाखापर्यंत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या गावात जमीनीच्या किमतीत वाढ झाल्यानंतर मी व वादीने आपसात संगनमत करून खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात संपूर्ण खोटा मजकूर कथन केला आहे.

५. वादीने दावा दाखल केल्याची माहिती मी माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले त्यापुर्वी नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, वादीने सन २००९-१० मध्ये त्याच्या अन्य मिळकतींमध्ये सुधारणा केली. तसेच विहीर व बोअरवेल देखील खोदले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वादीने प्रतिवादी क्र.१ हिला दावा मिळकत कायमस्वरुपी खरेदी दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या सांगण्यावरुन मी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीने प्रतिवादी क्र.१ हिच्याकडे तिच्या घरी जाऊन र.रु.४,१०,०००/- स्विकारुन दावा मिळकतीचे खरेदी खत उलटवून घेण्याची मागणी केली हे मी खोटे कथन करीत आहे. वादीने प्रतिवादी क्र.१ कडे दावा मिळकतीचे खरेदी खत उलटवून मागितल्याची तारीख मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीला त्याची पत्नीच्या संधीवातावरील आजाराच्या उपचाराकरीता र.रु.३,००,०००/- ची गरज होती हे मी खोटे कथन केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीने प्रतिवादीकडून उसणवार घेतलेली र.रु.३,००,०००/- परत करण्यासाठी दावा मिळकतीचे खरेदी खत प्रतिवादीच्या लाभात लिहून दिले हे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी व प्रतिवादी क्र.१ च्या दरम्यानच्या व्यवहाराबाबत प्रतिवादी

क्र.१ च्या राहत्या घरी नवनाथ निंबाळकर व बाबासाहेब निंबाळकर आणि मी स्वतः असे सर्वांसमक्ष बैठक झाली हे मी खोटे कथन करीत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

माझे समक्ष,

SHIVAJI N THAPEKAR

Digitally signed by SHIVAJI N THAPEKAR
Date: 2026.01.30 18:27:05 +0530

**(एस. एन. थापेकर)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कर्जत.

**दिनांक :** ३०.०१.२०२६
सदर जबाब मी टंकलिखित केला.

**(व्ही. जी. घोगरे)**
लघुलेखक,